# सकाळ



सोलापूर : मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने येथील जिल्हा परिषद शाळेत दिलेल्या सायकलींसोबत विद्यार्थिनी.

## शंभर विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने वारी मार्गावर तीन कायमस्वरूपीच्या शेड्स उभारण्यात आल्या आहेत. पिराची कुरोली, लोणी काळभोर आणि वाखरी (पंढरपूर) येथे वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी उभारलेल्या या शेड्सचे उद्घाटन निवासी जिल्हाधिकारी अजित देशमुख यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या वेळी प्रांताधिकारी सचिन ढोले, फिनोलेक्सचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, नितीन कुलकर्णी उपस्थित होते. लोणी काळभोर येथील शेडचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपमुख्याधिकारी संदीप कोहिनकार यांच्या हस्ते झाले. फाउंडेशनच्या सहकार्याने माढा तालुक्यात जल संधारण प्रकल्प, सोलापूरमधील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या शंभर विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. वडगाव आनंद येथील पक्के शेड आणि केईएम रुग्णालयात मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

Pune, Pune-Today
08/07/2019 Page No. 3